3547

जा.क्र./पोउआ/वाह/नियोजन/ /२०२२

**वाहतूक नियंत्रण अधिसुचना** दिनांक ३० /०८/२०२२

हिंजवडी वाहतुक विभागा अंतर्गत मुंबई-पुणे-बेंगलोर राष्ट्रीय महामार्ग क्र ४ वर जग्वार शोरुम ते चांदणी चौक पर्यतचे महामार्गाचा चा समावेश होत आहे. महामार्ग व त्याच्या लगत जोडले जाणारे इतर छोटे, मोठे रस्ते, हिंजवडी-माण आयटी पार्क, पिंरगुट एमआयडीसी कंपन्या तसेच आसपास रहिवासी व व्यावसायिक आस्थापना असल्याने नमुद मार्गावर जड-अवजड वाहंनाची वर्दळ सतत सुरु असते. त्यातच चांदणी चौक व सुसखिंड येथे उड्डाणपुल व रस्ते विकसनाचे काम सुरु असल्याने उर्वरित रस्ते पादचारी नागरिक व सार्वजनिक वाहतुकीस अपुरे पडत आहेत. त्यामुळे सकाळी व सायंकाळचे सत्रात चांदणी चौक, बावधन, पाषाण तलाव भागात मोठया प्रमाणात वाहनांची वर्दळ सुरु असते. महामार्गावर सतत वाहंनाचे गंभीर/किरकोळ/प्राणांतिक स्वरुपाचे अपघात घडुन येतात बहुतांश अपघात हे जड वाहन चालकांचे वेगावर नियत्रंण न राहिल्यामुळे घडत आहेत.

ज्याअर्थी पिंपरी चिंचवड शहरातील वाहतुक सुरक्षित व सुरळीतपणे होणेकरीता, महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र. एम. व्ही. ए. ०१९६/८७१/सी आर - ३७/टी आर ए - २, दिनांक - २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशन नुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (ए) (बी), ११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मी आनंद भोईटे, पोलीस उप-आयूक्त वाहतुक शाखा, पिंपरी चिंचवड शहर,यापुर्वी काही निर्बध असतील ते रद्द करण्यात येत असुन तात्पुरत्या स्वरुपात खालील प्रमाणे आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

<u>हिंजवडी / देहुरोड / वाकड वाहतूक विभाग</u>

१. सुसरोड-सुसखिंड पाषाण मार्गे राष्ट्रीय महामार्ग क्र ४ वरील चांदणी चौक/कोथरुड/कात्रज/सातारा भुगाव रोडवर जाणाऱ्या सर्व प्रकारच्या जड वाहनांना प्रवेश बंदी.

२.विदयापीठ चौकाकडुन भारत इलेक्ट्रॉनिक्स चौक बावधन पाषण रोड मार्गे राष्ट्रीय महामार्ग क्र ४ वरील चांदणी चौक/कोथरुड/कात्रज/सातारा/भुगाव रोडवर जाणाऱ्या सर्व प्रकारच्या जड वाहनांना प्रवेश बंदी.

३.भुगाव मुळशी रोडकडुन राष्ट्रीय महामार्ग क्र ४ वरील चांदणी चौक/बावधन/कोथरुड/कात्रज/सातारा कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या जड वाहनांना प्रवेश बंदी.

४. राष्ट्रीय महामार्ग क्र ४ वरील किवळे येथुन चांदणी चौक/कोथरुड/कात्रज/सातारा कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या जड वाहनांना प्रवेश बंदी.

५. एनडीए रोड कडुन चांदणी चौक मार्गे सातारा बाजुकडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या जड वाहनांना प्रवेश बंदी

तरी वरील मार्गावर सायंकाळी १८.०० ते २१.०० वाजे पर्यंत जडवाहनांना प्रवेश बंदी राहील.

सदरची अधिसुचना प्रायोगिक तत्वावर दिनांक ०१/०९/२०२२ चे ००.०० चे वाजेपासुन सुरु होईल व ती ३०/०९/२०२२ चे २४.०० वाजेपावेतो अमलात राहील.

(आनंद भोईटे)
पोलीस उप-आयुक्त, वाहतूक
पिंपरी चिंचवड

प्रति,

जिल्हा माहिती व प्रसिध्दी अधिकारी, नविन मध्यवर्ती इमारत, पुणे - ०१.

प्रत :

१) पोलीस आयुक्त पिंपरी चिंचवड आयुक्तालय

२) पोलीस निरीक्षक, प्रेसरुम, पोलीस आयुक्त कार्यालय, पिंपरी चिंचवड शहर.

/-सदर प्रेसनोटच्या प्रती पत्रकारांना देवून, सदरची बातमी वर्तमान पत्रातून प्रसिध्द करण्याची विनंती करावी.

३) प्रभारी अधिकारी, हिंजवडी, देहुरोड, वाकड वाहतुक विभाग

४) कार्यकारी अभियंता, सबंधीत प्रभाग, पिंपरी चिंचवड

/- सदर ठिकाणी वरील वाहतुक निर्बधाचे फलक बसविणेची कार्यवाही होणेस विनंती आहे.